# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २१/०८/२०२६ (शुक्रवार )**

........................................................................................

## घरफोडीचे २ गुन्हे उघड
## ७७ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त
## परिशवणी पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन पारशिवणी :– **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग यांच्या मार्गदर्शनात दिनांक २१/०८/२०२६ रोजी पारशिवणी पोलीसांनी घरफोडीचे २ गुन्हे उघड करून ७७,५००/– रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

पोलीस स्टेशन पारिशिवणी अंतर्गत दाखल अउघड गुन्हयाचा तपास करीत असतांना पारशिवणी पोलीस स्टेशनचे गुन्हे शोध पथकाचे अधिकार आणि अंमलदार यांनी गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे आरोपी एका विधीसंघर्षग्रस्त बालकाला निष्पन्न केले. दिनांक २१/०८/२०२६ रोजी विधीसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याने पोलीस स्टेशन पारशिवणी हद्दीत घरफोडीचे गुन्हे केल्याची माहीती दिली. **पोलीसांनी पंचासमक्ष १. लॅपटॉप किंमती १५,०००/– रूपये ,विनाक्रमांकाची ॲक्टीव्हा मोपेड किंमती ५०,०००/–रूपये, एक मोबाईल किंमती ५,०००/–रूपये, पिवळया धातुचे पदक किंमती ७,५००/–रूपये असा एकूण ७७,५००/– रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

**उघडकीस आलेले गुन्हे**

१.पोलीस स्टेशन पारशिवणी **अप.क्र. ५२४/२०२६, कलम ३०५(अ), ३३१(४) भा.न्या.सं.**
२.पोलीस स्टेशन पारशिवणी **अप.क्र. ३८०/२०२६, कलम ३०५(अ), ३३१(४) भा.न्या.सं.**

## १६.५ किलो प्रतिबंधीत सुंगधीत तंबाखुसह दुचाकी वाहन असा एकुण ५२ हजार ३०४ रूपयांचा मुद्देमाल जप्त नरखेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड** :— दिनांक १९/०८/२०२६ रोजी नरखेड पोलीसांना गोपनिय माहिती मिळाली की, महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु ची वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे नरखेड पोलीसांनी मौजा इंदिरानगर बेलोना हेटी हनुमान मंदिर जवळ नाकाबंदी केली असता होन्डा स्ल्पेंडर गाडी क्र. एम एच ३१ ए एल ९६४२ हे वाहन मिळुन आले. नमुद वाहनावर दोन इसम होतो त्यापैकी एक पोलीसांना पाहुन पळुन गेला. पोलीसांनी पंचासमक्ष सदर वाहनाची तपासणी केली असता महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. पोलीसांना सदर ठिकाणी एक विधीसंघर्षग्रस्त बालक मिळुन आला. त्याला त्याच्या पळुन गेलेल्या साथीदाराचे नाव पत्ता विचारले असता आरोपी नामे **प्रिंन्स पांढुरंग उईके रा. पाण्याचे टाकी जवळ, खडकपुरा, वार्ड क्र.५, नाचनगांव,पो. स्टे. पुलगाव, ता. देवळी, जि. वर्धा** अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली.

**पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष १६.५ किलोग्रॅम प्रतिबंघीत सुगंधीत तंबाखु साठा किंमती २२,३०४ /—रूपये आणि होन्डा स्ल्पेंडर गाडी क्र. एम एच ३१ ए एल ९६४२ किंमती ३०,००० /—रूपये असा एकुण ५२,३०४/—रूपयांचा मुद्देमाल केला आहे. नमुद आरोपीने सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा करून वाहतुक केली. नमुद आरोपी विरूद्ध पोस्टे नरखेड येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे**

कलम १२३, २२३,२७४, २७५, ३(५) सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

## नागपुर ग्रामीण पोलीसांच्या पाठपुराव्याने जलालखेड्यात शवविच्छेदन सेवा पूर्ववत

पोलीस स्टेशन जलालखेडा :— जलालखेडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदनासाठी आवश्यक असलेले ‘शवगृह सहाय्यक’ पद रिक्त असल्यामुळे शवविच्छेदनाची प्रक्रिया बंद होती. परिणामी, जलालखेडा व परिसरातील नागरिकांना मृतदेह शवविच्छेदनासाठी सुमारे ५० किलोमीटर अंतरावरील नरखेड येथे न्यावा लागत होता. त्यामुळे मृतांच्या नातेवाईकांना मोठ्या मानसिक, शारीरिक तसेच आर्थिक त्रासाला सामोरे जावे लागत होते.

नागरिकांची ही अडचण लक्षात घेऊन मा. श्री हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर ग्रामीण पोलीसांनी संवेदनशीलतेने पुढाकार घेत संबंधित आरोग्य विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला. पोलीस ठाणे जलालखेडा यांनी पोलीस अधीक्षक कार्यालय यांच्यामार्फत जिल्हा आरोग्य अधिकारी, नागपूर यांच्याकडे पत्रव्यवहार करून जलालखेडा प्राथमिक आरोग्य केंद्रातील शवविच्छेदन सेवा पूर्ववत करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली.

नागपूर ग्रामीण पोलीसांच्या या पाठपुराव्याची दखल घेत आरोग्य विभागाने आवश्यक कार्यवाही केली असून जलालखेडा प्राथमिक आरोग्य केंद्रातील शवविच्छेदन सेवा आता पुन्हा सुरू झाली आहे. या निर्णयामुळे जलालखेडा तसेच परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. मृतदेह दूरवर शवविच्छेदनासाठी नेण्याची वेळ टळल्याने मृतांच्या नातेवाईकांचा वेळ, श्रम आणि आर्थिक खर्च वाचणार आहे. कायदा व सुव्यवस्थेच्या जबाबदारीसोबतच नागरिकांच्या अडचणी जाणून घेऊन त्यावर तत्परतेने उपाययोजना करण्याचा नागपूर ग्रामीण पोलीसांचा लोकाभिमुख दृष्टिकोन या उपक्रमातून अधोरेखित झाला आहे.

# नरखेड पोलीस स्टेशन अंतर्गत मालमत्तेविरूध्द गुन्हयातील २ सराईत गुन्हेगारांना नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत **मालमत्तेविरूध्द गुन्हयातील** आरोपी **क्र १) रितेश अश्वजीत वानखेडे वय २३ वर्षे आणि क्र २) आयुष आशिष लखोटे, वय २२ वर्षे, दोन्ही रा. रामबाग इमामवाडा नागपूर यांना** महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

सराईत गुन्हेगार नामे **क्र १)रितेश अश्वजीत वानखेडे वय २३ वर्षे आणि क्र २) आयुष आशिष लखोटे, वय २२ वर्षे, दोन्ही रा. रामबाग, इमामवाडा नागपूर यांचेवर पोलीस स्टेशन नरखेड हद्दीत चोरी, घरफोडी** या सारखे **अनेक गुन्हे नोंद** आहे. नमुद आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी प्राप्त तक्रारींवर तात्काळ गुन्हे नोंद केले तसेच त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपी अशा प्रकारचे गुन्हे करीत असल्याने नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली होती तसेच आरोपींच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद आरोपीचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव नरखेड पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, काटोल यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद आरोपी **क्र १) .रितेश अश्वजीत वानखेडे वय २३ वर्षे आणि क्र २) आयुष आशिष लखोटे, वय २२ वर्षे, रा. रामबाग इमामवाडा नागपूर यांना २ महीन्यांकरीता** नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**



रितेश अश्वजीत वानखेडे



आयुष आशिष लखोटे

# नागपूर ग्रामीण पोलिसांनी राबवली अवैध दारूविरोधात विशेष मोहीम
# दारूबंदी कायद्यान्वये २० गुन्हे दाखल

**दिनांक २०/०८/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर ग्रामीण पोलिसांकडून अवैध दारूविक्री, दारूची साठवणूक विशेष जनजागृती व अंमलबजावणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान नागपूर ग्रामीण जिल्ह्यात दारूबंदी कायद्यान्वये एकूण २० गुन्हे दाखल करण्यात आले.**

**पोलीस स्टेशन बोरी** येथे २ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बेला येथे** १ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन** काटोल **येथे** १ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड येथे** १ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा येथे** १ गुन्हे नोंद,**पोलीस स्टेशन रामटेक येथे** २ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन अरोली येथे** २ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन भिवापुर येथे** १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन वेलतुर येथे** १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन मोहपा येथे** १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन सावनेर येथे** ४ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे** १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन खापा येथे** १ गुन्हा नोंद आहे

**नमुद कारवाईत एकुण ३६९०० मिली देशी दारू, २५ लिटर मोहाफुल दारू, इतर साहित्य असा एकुण १८,९५२/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने